**प्रसिध्दी पत्रक** **दिनांक ०५/०२/२०२४**

आरोपी लोकसेवक १) श्री. गणेशसिंग बबनसिंग बायस, वय २८ वर्षे, कनिष्ठ अभियंता, विजवितरण कार्यालय कन्हैय्यानगर जालना, (वर्ग-३), आरोपी खाजगी ईसम क्रं. २) श्री विष्णु धोंडिबा दांडगे, व्यवसाय-कंत्राटी लाईन हेल्पर, विजवितरण कार्यालय विजविरण कार्यालय जालना आरोपी खाजगी ईसम क्रं. ३) श्री. भुषण अशोक वैलकर, वय ३२ वर्षे, व्यवसाय-कंत्राटी लाईन हेल्पर ग्रामीण शाखा, सहाय्यक अभियंता कार्यालय कन्हैयानगर जालना. क्रं. ०३ यांनी तक्रारदार यांच्याकडून 50000/- रुपये लाचेची रक्कम स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या जाळ्यात.

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | :- | छत्रपती संभाजीनगर |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे सदर बाजार जालना, जिल्हा जालना येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| आरोपी यांचे नाव व पत्ता | :- | १) श्री. गणेशसिंग बबनसिंग बायस, वय २८ वर्षे, कनिष्ठ अभियंता, विजवितरण कार्यालय कन्हैय्यानगर जालना, (वर्ग-३),<br>आ.खा.ई. क्रं. २) श्री विष्णु धोंडिबा दांडगे, व्यवसाय-कंत्राटी लाईन हेल्पर, विजवितरण कार्यालय विजविरण कार्यालय जालना.<br>आ.खा.ई. क्रं. ३) श्री. भुषण अशोक वैलकर, वय ३२ वर्षे, व्यवसाय-कंत्राटी लाईन हेल्पर ग्रामीण शाखा, सहाय्यक अभियंता कार्यालय कन्हैयानगर जालना. |
| लाच मागणी रक्कम | :- | 50000/-रुपये. |
| लाच स्विकृती रक्कम | | 50000/- रुपये |
| सापळा अधिकारी | :- | श्री अमोल धस, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांचे हॉटेल समृध्दी बियरबार परमीट रुम विना कोटेशन अनधिकृतपणे लाईट घेऊन वापरल्याने त्यांचे विरुध्द गुन्हा दाखल न करता कोटेशन देऊन रेग्युलर लाईट सुरु करुन देण्यासाठी. |
| थोडक्यात माहिती | :- | यातील तक्रारदार यांचे हॉटेल समृध्दी बियरबार परमीट रुम गुंडेवाडी फाटा, राजुर रोड, जालना येथे असून तेथे विना कोटेशन अनधिकृतपणे लाईट घेऊन वापरल्याने तक्रारदार यांचे विरुध्द गुन्हा दाखल न करता कोटेशन देऊन रेग्युलर लाईट सुरु करुन देण्यासाठी यातील आरोपी लोकसेवक क्रमांक 1) श्री गणेशसिंग बायस यांनी तक्रारदार यांच्याकडे 50000/-रुपये लाचेची मागणी करित असल्याने, तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने, लाचलुचपल प्रतिबंधक विभाग छत्रपती संभाजीनगर या कार्यालयात तक्रार दिली.<br>तक्रारदार यांचे तक्रारीवरुन दि. 05/02/2024 रोजी पंचासमक्ष केलेल्या पडताळणी दरम्यान आ.लो.से. क्र. 1 श्री.गणेशसिंग बायस यांनी तक्रारदार यांना रुपये 50,000/- लाचेची मागणी करुन खाजगी आरोपी क्रं. 2 श्री.विष्णु दांडगे यांचेकडे देण्याबाबत सांगितल्याचे निष्पन्न झाले.<br>त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर तर्फे आजच दि. 05/02/2024 रोजी सापळा आयोजीत केला असता, खाजगी आरोपी क्रं. 2) श्री. विष्णु दांडगे यांनी तक्रारदार यांना खाजगी आरोपी क्रं. 3) श्री. भुषण वैलकर यांचेकडे विजवितरण कार्यालय कन्हैय्या नगर येथे लाचेची रक्कम देण्यास सांगितले. त्यावरुन पंचा समक्ष तक्रारदार यांच्या कडुन खाजगी आरोपी क्रं. 03 भुषण वैलकर यांनी 50000/- रुपये लाचेची रक्कम स्विकारली आहे. लाचेच्या रकमेसह खाजगी कंत्राटी आरोपी क्रं. 3 भुषण वैलकर यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचे विरुध्द पोलीस स्टेशन सदर बाजार जालना, जिल्हा जालना येथे तक्रारदार यांचे फिर्यादी वरुन गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे. |

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मा.संदिप आटोळे, अपर पोलीस अधीक्षक मुकुंद आघाव, पोलीस उप अधीक्षक राजीव तळेवर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री अमोल धस यांनी केली आहे. त्यांना सदर कारवाई कामी पोलीस हवालदार सुनिल पाटील, शिरीष वाघ, चालक पो.अं. चंद्रकांत शिंदे यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद
ई- मेल :- sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com
ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,
पोलीस अधीक्षक :- 9923023361 अपर पोलीस अधीक्षक :- 9881460103
पोलीस उप अधीक्षक :- 9823498777

(राजीव ओ. तळेकर)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
छत्रपती संभाजीनगर

Scanned with OKEN Scanner